**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५१६/२०१९</u>**

(विजयसिंह मारुती चव्हाण वि. अंकुश काशिनाथ सुर्यवंशी व इतर)

**<u>निशाणी क्र. १८ खालील आदेश</u>**

(पारित दिनांक १८/१२/२०२१)

प्रस्तुतचा अर्ज मयत वादीचे वारसाने प्रस्तुत दाव्यातील मयतांचे वारस रेकॉर्डवर आणणेकरिता व त्याकरिता मूळ दावा अर्जामध्ये दुरुस्ती करण्याकरिता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादीने त्यांचे म्हणणे (नि.१८) दाखल करुन सदरील अर्जास तिव्र आक्षेप घेतला आहे. प्रतिवादीने असे कथन केले आहे की , प्रस्तुत दाव्याचे कामातील प्रतिवादी क्र. ७ व ८ हे ब–याच वर्षांपूर्वी मयत झालेले आहेत. वादींना हे माहित असूनही त्यांनी दावा लांबवणीवर टाकणेचे हेतूने त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी उशीरा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे वादीचे वारसांनी केलेला अर्ज नामंजूर करणेत यावा किंवा मंजूर करणेचे झालेस भरीव रक्कम आकारुन अर्ज मंजूर करणेत यावा, असे प्रतिवादीने म्हणणे दाखल केले आहे.

०३. अर्जदाराने असे कथन आहे की, या कामातील मूळ वादी हे दि.१५/०६/२०२१, प्रतिवादी क्र. ९ हे दि. १४/०९/२०१३, प्रतिवादी क्र. १५ हे दि. ०४/१२/२०१६, प्रतिवादी क्र. ७ हे दि. ३१/१२/२०११ रोजी मयत झालेले आहेत तसेच प्रतिवादी क्र. ८ हे मयत असलेबाबतची बाब प्रतिवादींनी नाकारलेली नाही. सदर दाव्याचे कामी एकमेव मूळ वादी व इतर ४ प्रतिवादी मयत झाल्यामुळे त्यांचे वारस रेकॉर्डवर येणे कायद्याच्या व न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. अन्यथा सदरील मयतांचे वारसांचे कधीही कशाच्याही स्वरुपात न भरुन येणारे फार मोठे नुकसान होणार होऊ शकते. करिता मूळ दाव्यामध्ये दुरुस्ती होऊन मयतांचे वारस रेर्कार्डवर घेणेची विनंती अर्जदाराने केली आहे.

०४. वादी व प्रतिवादीतर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अर्ज, म्हणणे व मुळ दावा अर्ज याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की , सदरचा मूळ दावा हा वादीचे दावा मिळकतीमध्ये प्रतिवादीने कोणत्याही प्रकारे हरकत /अडथळा करु नये, अशी प्रतिवादीविरुद्ध कायम व निरंतरची ताकीद होणेसाठी दाखल केला आहे. अर्जदाराने मूळ मयत वादीचे व प्रतिवादी क्र. ७, ९ व १५ यांचे मृत्युप्रमाणपत्र दाखल केले आहे. प्रतिवादींनी प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. ७ व ८ हे मयत असलेबाबत आक्षेप घेतलेला नाही. मूळ दाव्यातील वादविषय पाहता मयतांचे वारस रेकॉर्डवर असणे गरजेचे आहे. प्रस्तुत दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेकरिता मयतांचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. मयतांचे वारसांबाबत कोणताही गंभीर आक्षेप प्रतिवादींनी घेतलेला नाही. त्यामुळे सदरील वारस प्रस्तुत दाव्याचे कामी रेकॉर्डवर असणे आवश्यक आहे. त्याकरिता मूळ दावा अर्जातील दुरुस्ती आवश्यक व गरजेचे आहे. करिता पुढीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आ दे श

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांनी सदरची दुरुस्ती नियमानुसार विहीत कालावधीत करावी.

३. वादीने सदरची दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करावयाची आहे.

४. त्यानंतर अर्जदाराने निशाणी १ ची दुरुस्तप्रत न्यायालयात दाखल करावयाची आहे.

SANGEETA SAGAR VANKORE

Digitally signed by SANGEETA SAGAR VANKORE
Date: 2021.12.24 15:28:09 +0530

ठिकाण– कराड (श्रीमती. सं.सा.वनकोरे)

दिनांक– १८/१२/२०२१ २ रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, कराड.